महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यात "पीएमश्री" च्या धर्तीवर "सीएमश्री" शाळा धोरण राबविण्याबाबत

(१) २० (०५-०५-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने "पीएमश्री" च्या धर्तीवर राज्यात "सीएमश्री" योजना राबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सीएमश्री योजनेअंतर्गत केवळ सरकारी शाळा घेतल्याचे व या शाळांमध्ये बालवाटिका, स्मार्ट क्लासरुम, प्रशिक्षित शिक्षकांची व्यवस्था, पायाभूत सुविधा, व्यावसायिक शिक्षण आदि गोष्टींचा समावेश त्यामध्ये करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यामध्ये केंद्र शासनाच्या "पीएमश्री शाळा" योजनेच्या धर्तीवर "सीएमश्री" शाळा योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.सदर योजनेसाठी शाळा निवडीचे निकष, निवडलेल्या शाळांना प्रस्तावित लाभ याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे .
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे असल्याबाबत

(२) ३१६ (०५-०५-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भीमराव केराम (किनवट), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू असताना ठाणे जिल्हा परिषदेच्या १,३२६ शाळांमध्ये ८२७ शिक्षकांची पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे काय, तसेच मुंबईतील शासकीय व अनुदानित शाळांमध्ये अतिरिक्त ५०० शिक्षक पदे रिक्त असल्याची निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असतानाही ठाणे जिल्ह्यात आंतर जिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेमध्ये सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे

आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या रिक्त पदांचा ग्रामीण व आदिवासी बहुल दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असून, त्यामुळे प्राथमिक शिक्षणाचा दर्जा खालावत असल्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. तसेच शिक्षकांच्या अभावामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाविषयी शासनाचे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यात शिक्षक भरती प्रक्रियेचा दुसरा टप्पा पवित्र संकेतस्थळाच्या माध्यमातून राबवण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे काय, तसेच शिक्षकांच्या रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत माहे सप्टेंबर, २०२५ अखेर प्राथमिक शिक्षकांची ३८६६ पदे मंजूर असून ३२६३ पदे कार्यरत आहेत व ६०३ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) ठाणे जिल्ह्यात विद्यार्थी अध्ययन स्तर निश्चितीसाठी "दिशा" हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात येत असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मदत झाली आहे. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याअधारे शिक्षक भरतीची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पेसा अंतर्गत भरती प्रक्रियेला मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने शिक्षक भरतीची प्रक्रिया स्थगित आहे. यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून दिनांक १५ जुलै, २०२४ च्या शासन पत्रान्वये कंत्राटी स्तरावर मानधनावर पेसा अंतर्गत शिक्षक भरतीची परवानगी देण्यात आलेली आहे.

नवीन शैक्षणिक धोरण आराखडा २०२४ च्या अंमलबजावणीबाबत

(३) १३६० (०५-०५-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ ची निर्मिती केली असून अद्याप सदरहू नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कला व्यावसायीक शिक्षणाचा शालेय अभ्यासक्रम आराखडयात समावेश करणे आवश्यक आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नवीन शैक्षणिक धोरणांची शासनास अमंलबजावणी करण्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यामुळे शासनाने या आराखडाच्या अंमलबजावणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१०-११-२०२५) : (१), (२), (३), व (४)

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ हे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (State

Council of Educational Research and Training, Maharashtra), पुणे यांचेमार्फत तयार करण्यात आले आहेत. तसेच, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ तयार करण्यात आला आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (State Council of Educational Research And Training, Maharashtra), पुणे यांचेमार्फत तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४, राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदी तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांची अंमलबजावणी सन २०२५-२६ पासून राज्यात टप्प्या-टप्प्याने लागू करण्याबाबत दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण (२०२३), राज्य अभ्यासक्रम आराखडा- शालेय शिक्षण २०२४ यांच्या मध्ये 'व्यवसाय शिक्षणाची नवकल्पना मांडली आहे. विद्यार्थ्यांना शेतीविषयक, यंत्र व सामग्री विषयक आणि मानवी सेवा या क्षेत्रातील प्रकल्प दरवर्षी करायचे आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना अपार आयडी देण्याबाबत

(४) १८३९ (०५-०५-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशानुसार "वन नेशन, वन स्टुडंट आयडी" या संकल्पनेअंतर्गत, राज्यातील प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री (अपार आयडी) तयार करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहिमेअंतर्गत अद्याप राज्यातील व जालना जिल्ह्यातील किती शाळांमधून विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्यात आले आहेत तसेच, जालना जिल्ह्यातील व राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनविण्याचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अपार आयडी न बनविणाऱ्या शाळांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०६-११-२०२५) : (१) होय.

(२) व (३) दिनांक ०३.१०.२०२५ पर्यंत राज्यातील ८२.६६ टक्के व जालना जिल्हयातील ८१.५६ टक्के विद्यार्थ्यांचे "अपार आयडी" तयार करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिनांक २५ सप्टेंबर, २०२४, दिनांक २३ ऑक्टोंबर, २०२४ व दिनांक ०६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिका आयुक्त व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना अपार आयडी तयार करणेबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच, विभागनिहाय अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन करुन त्यांनी सर्व शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महात्मा ज्योतिबा फुले आणि सवित्रीबाई फुले यांचे समग्र साहित्याचे पुनर्मुद्रण प्रकाशनाबाबत

(५) १८५४ (०५-०५-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले यांचे समग्र साहित्याचे पुनर्मुद्रण प्रकाशनाबाबत महात्मा फुले चरित्र साधने समितीच्या वतीने कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महात्मा फुले यांचे डीटीपी झालेले साहित्य प्रकाशनाअभावी पुणे, मुंबई आणि नागपूरच्या शासकीय मुद्रणालयात प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) महात्मा फुले समग्र वाड्मय आणि सावित्रीबाई फुले वाड्मयाच्या प्रतींची छपाई करून वितरणासाठी उपलब्ध करून देण्याची राज्यातील लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

महात्मा ज्योतीबा फुले यांच्या समग्र साहित्याच्या १३ ग्रंथाची मुद्रीते पुर्नमुद्रीत करण्यास शासकीय मुद्रणालयास पाठविण्यात आली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) (१) महात्मा फुले समस्त साहित्य -४ तृत्तीय रत्न (हिंदी) (२) महात्मा फुले समस्त सहित्य-२ सार्वजनिक सत्यधर्म (हिंदी) (३) सावित्रीबाई फुले समग्र वाड:मय (४) महात्मा फुले समग्र वाड:मय (५) महात्मा ज्योतीराव फुले समस्त साहित्य –गुलामी (हिंदी अनुवाद) (६) युगपुरुष महात्मा फुले (हिंदी) (७) Collected Works of Mahatma Pule-I Slavery (८) Collected Works of Mahatma Phule-२ Selection (९) Collected Works of Mahatma Phule-३ Cultivators Whipcord (१०) आम्ही पाहिलेले फुले (११) महात्मा फुले समस्त साहित्य -३ किसान का कोडा (हिंदी) (१२) महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा (१३) महात्मा फुले समग्र वाड:मय इत्यादी ग्रंथाच्या आवृत्ती उपलब्ध नसल्याने या ग्रंथाची मुद्रीते पुर्नमुद्रीत करण्यासाठी शासकीय मुद्रणालयास पाठविण्यात आलेली आहेत. तसेच महात्मा ज्योतीबा फुले समग्र वाड:मय या ग्रंथाच्या २००० प्रती आणि सावित्रीबाई फुले समग्र ग्रंथाच्या २००० प्रती वाचकांसाठी शासकीय ग्रंथागारात उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पवित्र पोर्टल २०२२ शिक्षक भरतीमध्ये कन्नड भाषिक शाळेत कन्नड माध्यम धारकांना प्राधान्य देणेबाबत

(६) १९७८ (०५-०५-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवित्र पोर्टल २०२२ शिक्षक भरती मध्ये कन्नड भाषिक शाळेमध्ये विशेषत: इंग्रजी व हिंदी निवडीमध्ये कन्नड भाषा धारकांना प्राधान्य देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कन्नड भाषिक शाळेमध्ये कन्नड शिक्षकांची भरती केल्यास, कन्नड विद्यार्थ्यांना इंग्रजी व हिंदी भाषेबरोबर त्यांच्या मातृभाषेत भाषांतर करणे सोयीचे होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कन्नड भाषा धारक उमेदवार शिक्षक निवडी पासून वंचित राहणार नाहीत, याबाबत उचित कार्यवाही

करण्याची न्याय मागणी जत तालुक्यातील कन्नड उमेदवारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१), (२) व (३) होय हे खरे आहे.
(४) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार पहिल्या टप्प्यामध्ये उमेदवारांची झालेली शिफारस विहित नियमानुसार करण्यात आलेली आहे. विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांची याबाबतची मागणी विचारात घेऊन, सेमी इंग्रजी व भाषा विषयाच्या पदभरतीसाठी देखील इयत्ता १० वीचे माध्यम विचारात घेण्याबाबत दिनांक ०६ सप्टेंबर, २०२४ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. यानुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या दूसऱ्या टप्प्यामध्ये सेमी इंग्रजीचे गणित व विज्ञान विषय तसेच भाषा विषयाकरीता उमेदवारांचे इयत्ता १० वी पर्यंतचे माध्यम विचारात घेऊन शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच यापुढील सर्व शिक्षक भरती मध्ये देखील यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

राज्यात पूर्व प्राथमिक बालवाडया (प्ले स्कूल) सुरु करण्याबाबत

(७) २३८९ (०५-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी प्ले स्कुल/खासगी बालवाड्या सुरू करण्याबाबत तसेच मुलांकडून शुल्क आकारणी आणि संस्थांच्या नोंदणीसंदर्भात कोणतेही नियम/निकष अद्याप अस्तित्वात नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील तीन ते सहा वर्षे वयोगटातील सुमारे ३२ लाख ४९ हजार मुलांचे शिक्षण विविध खासगी बालवाड्यांमध्ये सुरू असून या संस्थांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे तसेच वाहनतळ, घरे व अन्य जागांमध्ये विनानियम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरू असलेल्या अशा खासगी बालवाड्या व प्ले ग्रुप संस्थांवर नियंत्रण मिळवण्यासाठी व अंगणवाड्यांप्रमाणे प्ले ग्रुपसाठीही शासकीय नियमावली लागू करण्यारिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सध्या तीन ते सहा वयोगटातील बालकांच्या शाळापूर्व शिक्षणाची जबाबदारी महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बालविकास सेवेवर असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, विनानियम चालविल्या जाणाऱ्या खासगी बालवाड्यांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१०-११-२०२५) : (१), (२), (३), (४) व (५) सद्य:स्थितीत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बालवाड्या व अंगणवाड्या यांची नोंदणी व माहिती हे महिला व बाल विकास विभाग यांचेकडे आहे. तथापि, खाजगी पूर्व प्राथमिक वर्गांची/संस्थांची अधिकृत माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. त्या अनुषंगाने, वयोगट ३ ते ६ साठी पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी केंद्रांची माहिती एकत्रित स्वरूपात राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर तसेच पालकांनाही उपलब्ध असावी या उद्देशाने, शासन परिपत्रक दिनांक २४ एप्रिल, २०२५ अन्वये वय वर्ष ३ ते ६ या वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या www.education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील प्री स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच, राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थांवर नियंत्रण आणण्याकरिता पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षण व संगोपन कायदा, २०२५ (Early Childhood Care and Education Act, २०२५) व त्या अनुषंगाने नियमावली करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. सदर कायदा व नियमावली अस्तित्वात आल्यानंतर त्यामधील तरतूदींनुसार पूर्व प्राथमिक शिक्षण देण्याबाबत कार्यवाही करणे खाजगी संस्थांना आवश्यक राहील.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शिक्षणाधिकारी व तत्सम या संवर्गातील पदोन्नतीची रिक्त पदे भरण्याबाबत

(८) २८५४ (२८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षणाधिकारी व तत्सम या संवर्गातील पदोन्नतीची रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीनुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१४-११-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत पदोन्नतीने रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई पूर्व उपनगरात क्रीडा संकुल उभारण्याबाबत

(९) ४६९९ (०५-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरात कोणतेही क्रीडा संकुल नसल्यामुळे मुंबई पूर्व उपनगरात क्रीडा संकुल स्थापन करण्याची शासनाची योजना आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानखुर्द गावातील न. भु. क्र.११५ बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास आराखडा २०३४ मध्ये 'महानगरपालिकेच्या क्रीडा संकुलासाठी' (ROS २.४ Municipal Sports Complex) क्षेत्रफळ १०,३३३.९१ चौरस मीटर राखीव ठेवले असून सदर भूखंड शासनाच्या अखत्यारित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी लोकप्रतीनिधींद्वारे क्रीडा संकुलाबाबत शासनास प्रस्ताव सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (११-११-२०२५) : (१), (२), (३) व (४) सन २००१ च्या क्रीडा धोरणानुसार, बृहन्मुंबई मनपा क्षेत्रात २४ तालुका क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कुर्ला तालुक्यातील निर्लमनगर, मुलुंड येथे ७५१० चौ.मी. जागेवर क्रीडा संकुलासाठी रु.१२०.२९ लक्ष एवढा किंमतीच्या अंदाजपत्रक मान्यता दिली असून रु.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. शासन निर्णय दिनांक २३/०३/२०२२ नुसार, क्रीडा संकुल उभारणीसाठी सुयोग्य जागा क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करणे आवश्यक आहे. तथापि, मानखुर्द येथील जागा क्रीडा संकुल समितीस निर्विघ्नपणे उपलब्ध झाल्यावरच क्रीडा संकुल उभारण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
५) प्रश्न उद्‌भवत नाही.

असर अहवालावरील शिक्षक समितीच्या आक्षेपासंदर्भात

(१०) ६११३ (०५-०५-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असर या अहवालाच्या माध्यमातून प्रथम संस्थेकडून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांबाबत अधिकाधिक गैरसमज पसरवून ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा व तेथील शिक्षकांची अवहेलना होत असल्याबाबत, तसेच शासकीय शाळांच्या माथी शैक्षणिक साहित्य मारण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने आक्षेप घेतला असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ‘असर’ संस्थेने गावातील मैदानावर, रस्त्यावर, पारावर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट प्रश्न विचारून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची पडताळणी केली असल्यामुळे सदर सर्वेक्षण वास्तवदर्शक व पारदर्शक नसल्याचा आरोपही समितीचे राज्य सरचिटणीस यांनी त्याच कालावधीत केला असल्याचे निदर्शनास आले आहे
हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०६-११-२०२५) : (१) व (२) यासंदर्भात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समितीने महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे निवेदन दिले आहे.
(३) विद्यार्थ्यांचा संपादणूक स्तर तपासण्यासाठी वेगवेगळया चाचण्या घेतल्या जातात. तसेच विद्यार्थी संपादणूकीचा वेगवेगळया स्तरावर आढावा घेण्यात येतो. सदर चाचण्यांवरुन प्राप्त संपादणूकीचे शासन स्तरावरुन विश्लेषण केले जाते व त्यावरुन पुढील दिशा ठरविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कन्नड (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात पटसंख्येअभावी वस्तीशाळा बंद पडत असल्याबाबत

(११) ६६३१ (०५-०५-२०२५). श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अशा महसुली गावे, वाड्या, तांडे व वस्त्यांमध्ये ज्या ठिकाणी प्रचलित नियमांनुसार शाळा सुरु करणे शक्य नव्हते, अशा ठिकाणी वस्तीशाळा सुरु करण्याचा निर्णय सन २००० मध्ये घेण्यात आला होता काय, त्यानुसार

वि.स. २० (8)

कन्नड (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात एकूण ९३ वस्तीशाळांची स्थापना करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्तीशाळांची स्थापना करण्यात आलेली असल्यास, कन्नड तालुक्यात स्थापन करण्यात आलेल्या ९३ वस्तीशाळांपैकी १७ वस्तीशाळा पटसंख्येअभावी सन २०२० ते २०२४ या कालावधीत बंद झाल्याची माहिती दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १७ वस्तीशाळा बंद झाल्या असतील तर शाळांसाठी बांधण्यात आलेल्या वर्गखोल्या व शाळा परिसराचा उपयोग, त्या जागेचे मूळ मालक (ज्यांनी जिल्हा शिक्षण विभागास जागा दानपत्र दिली होती) वास्तव्यासाठी, गुरे, पाळीव प्राणी, शेतीसंबंधी साहित्य व जनावरांचा चारा ठेवण्यासाठी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा ठिकाणी वस्तीशाळांची पटसंख्या वाढवून पुन्हा शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे तसेच, शाळांच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३०-१०-२०२५) : (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) सदरच्या १७ वस्तीशाळांपैकी ९ वस्तीशाळांमध्ये अतिक्रमणे झालेली नसून ७ वस्तीशाळांमध्ये अतिक्रमण झालेले आहे. सदरचे अतिक्रमणे काढण्याबाबत केंद्रप्रमुख यांचेमार्फत संबधितांना सूचीत केले आहे. सदर अतिक्रमण लवकरच काढून घेण्यात येईल. तसेच एका वस्तीशाळेमध्ये जागेबाबत वाद असल्यामुळे याची सखोल चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील युवकांसाठी आयटीआय मध्ये खणी कर्म आणि पोलाद उद्योगाशी संबंधित “विशेष अभ्यासक्रम” सुरु करणेबाबत

(१२) ६९८२ (०५-०५-२०२५). डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील युवकांना जिल्ह्याच्या औद्योगीकरणात सहभागी होण्यासाठी त्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देण्याची गरज असून त्यादृष्टीने जिल्ह्यात सुरू झालेल्या खणी कर्म आणि पोलाद उद्योगासाठी लागणारे कौशल्य शिकविण्यासाठी काही “विशेष अभ्यासक्रम”आयटीआय मध्ये सुरू करण्याची योजना आखण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील आयटीआय अद्यावत करण्यासाठी पुरेसा मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत जिल्ह्यातील आयटीआय मधील कर्मचाऱ्यांच्या किती जागा रिक्त आहेत,

(४) असल्यास, उक्त रिक्त जागा भरण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (१३-१०-२०२५) : (१) हे खरे आहे. शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ अन्वये गडचिरोली जिल्हयातील राजे विश्वेशराव अत्राम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आदिवासी) आलापल्ली, जि. गडचिरोली (२ तुकडया) आणि क्रांतीवीर राजा वेंकटप्पा नायक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आदिवासी)

आरमोरी, जि. गडचिरोली (१ तुकडी) येथे खणीकर्म (Mechanic Mining Machinery) हा व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) ते (५) गडचिरोली जिल्हयातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदांच्या एकत्रित एकूण १८७ जागा रिक्त आहेत.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची पदभरती जाहिरात क्र.०१/२०२२, दिनांक १७.८.२०२२ अन्वये गडचिरोली जिल्हयामध्ये इतर व्यवसायाकरीता शिक्षकीय संवर्गातील एकूण ६० पदे भरण्यात आली आहेत व जाहिरात क्र. ०२/२०२२ अन्वये शिक्षकीय संवर्गातील ५ व शिक्षकेतर संवर्गातील ११ पदे भरण्यात आली आहेत.

उल्हास नदी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत

(१३) ७११२ (१९-०८-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्याच्या सिंचनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या उल्हास नदी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या शासनाच्या प्रारंभिक अहवालानुसार रुपये ४१५५.८५ कोटी इतका खर्च येणार असून त्यादृष्टीने सिम्स संस्थेमार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हास नदीतील पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी सुमारे १०८ किमी लांबीची टनेल, १२२ किमी लांबीची जलवाहिनी रेषा, ३२५० एमएलडी क्षमतेचे पंपिंग स्टेशन, विद्युत सबस्टेशन्स आदी पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी, तांत्रिक कौशल्य व वेळ लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत मोठा कालावधी लागण्याची शक्यता असून दरम्यानच्या काळात कोकणातील सिंचन, पाणीपुरवठा, पर्यावरण व पर्जन्यमान यावर त्याचा परिणाम होऊ शकतो, तसेच, या प्रकल्पात ज्या भागातील पाण्याचे पुर्नवाटप केले जाणार असून त्या भागातील लोकांचे व शेतकऱ्यांचे हित वगळले जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर उल्हास नदीतील पाणी गोदावरीमध्ये वळवण्याच्या प्रकल्पासंदर्भात स्थानिक लोकांचा सहभाग, पर्यावरणीय मूल्यांकन, निधी उपलब्धता व कार्यवाहीच्या कालमर्यादेचा विचार करून शासनाने सविस्तर धोरण ठरविले आहे काय,
(५) असल्यास, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि समन्वय राखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२१-११-२०२५) : (१) सिम्स संस्थेमार्फत तयार करण्यात आलेल्या सविस्तर अहवालाबाबत विभागास ज्ञात नाही.

तथापि, कोकण महामंडळामार्फत वैतरणा व उल्हास नदी खोऱ्यातील समुद्रामध्ये वाहुन जाणारे अतिरिक्त पाणी मराठवाडा प्रदेशासाठी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) कोकणातील पाणी गोदावरी खो-यात वळविण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झालेनंतर सदर बाबींसंबंधी भाष्य करता येणे शक्य आहे.
(३) कोकणातील पाणी गोदावरी खो-यात वळविण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झालेनंतर सदर बाबींसंबंधी भाष्य करता येणे शक्य आहे.
(४) सदर बाबींच्या नियोजनाबाबतचा उहापोह सविस्तर प्रकल्प अहवालात असणार असून, त्यानुसार प्रकल्प अहवालास मान्यता देते वेळी उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) सद्यःस्थितीत सदर प्रकल्पाचा फक्त सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेची कार्यवाही चालू असून, कामाबाबत शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

शालेय क्रीडा स्पर्धा व क्रीडा शिक्षकांची नियुक्तीबाबत

(१४) ७१५० (१९-०८-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय क्रीडा स्पर्धांसाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य असून बीड जिल्ह्यातील सुमारे ७०५ शाळांनी क्रीडा शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणी केली नसल्यामुळे शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये ग्रामीण व दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांचा सहभाग देखील अपुरा राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पालघर व इतर जिल्ह्यांतील विविध शाळांमध्ये क्रीडा शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे क्रीडा शिक्षक उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१), (२), (३) व (४) संच मान्यतेच्या विहीत करण्यात आलेल्या निकषांमध्ये शिक्षक निश्चित करताना कला व क्रीडा शिक्षक या विषयाकरीता पूर्णवेळ शिक्षक देण्याची तरतूद नसल्याने, या विषयासाठी शिक्षक नव्याने नियुक्त केले जात नव्हते. त्यामुळे आता दिनांक १५ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या संचमान्यतेच्या निकषांमध्ये विशेष शिक्षक कला व क्रीडा या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. यास्तव संचमान्यतेच्या निकषानुसार या विषयाकरीता पदे निश्चित होऊन यापुढील शिक्षक भरतीमध्ये कला व क्रीडा या विषयाकरीता शिक्षकीय पदांचा समावेश होणार आहे. त्यामुळे संचमान्यतेचे निकष पूर्ण होणाऱ्या सर्व शाळांना क्रीडा शिक्षक उपलब्ध होणार आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघरमधील वैतरणा नदीचे पाणी नाशिक-मराठवाडयाला वळविण्याबाबत

(१५) ८२२४ (१९-०८-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणासह मुंबई महानगर, ठाणे, पालघर, वसई, विरार या शहरांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना राज्य शासनाने पालघरमधील वैतरणा नदीचे पाणी नाशिक-मराठवाडयाला वळविण्याची योजना तयार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दमणगंगा, वैतरणा, गोदावरी, नदीजोड प्रकल्पासाठी वैतरणा नदीतून अतिरिक्त असलेले पाणी गोदावरीच्या पात्रात वळविले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील आदिवासी पाडे, शहरांना पाण्याचा तुटवडा होत असतांना पाणी वळविले जाणार असल्याने कोकणासह, मुंबई, ठाणे, पालघर शहरातील नागरिकांकडून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. गिरीश महाजन (२१-११-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे.

कोकण महामंडळामार्फ़त वैतरणा व उल्हास नदी खोऱ्यातील समुद्रामध्ये वाहुन जाणारे अतिरिक्त पाणी मराठवाडा प्रदेशासाठी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यातील पाडे, शहरांना पाणी पुरवठा करणेसाठी काळू, शाई, बाळगंगा, देहरजी, सुसरी, खोलसापाडा - १, कोंडाणे हे प्रकल्प विभागांमार्फत हाती घेण्यात आले असून दमणगंगा-पिंजाळ नदीजोड योजना सर्वेक्षण व अन्वेषणातंर्गत आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात पाचवी व आठवीचे वर्ग सुरू करण्यासाठी शाळांकडून प्रस्ताव सादर न केल्याबाबत

(१६) ८२४९ (१९-०८-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात नव्याने पाचवी व आठवीच्या वर्गांसाठी कोणत्याही शाळेने अद्याप शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार चौथी-पाचवी व सातवी-आठवी वर्ग एकत्रित करण्याबाबतचे शासनाचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्देशानुसार त्या-त्या जिल्ह्यात शाळांच्या मागणीनुसार शाळांकडून प्रस्ताव शासनाकडे पाठविले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शाळांकडून प्रस्ताव प्राप्त न होण्यामागील कारणे कोणती असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०३-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिलह्यातील तीन शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग जोडण्याबाबतच्या प्रस्तावास जून, २०२४ मध्ये मंजूरी देण्यात आली आहे. तसेच, मे, २०२५ मध्ये दोन शाळांना व जून २०२५ मध्ये अन्य दोन शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच, सन २०२५-२६ एका शाळेस इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे.

(२) व (३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणांचा अधिकार अधिनियम, २००९ व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते ४ थी च्या शाळेस इयत्ता ५ वी चा वर्ग व इयत्ता १ ली ते ७ वी च्या शाळेस इयत्ता ८ वी चा वर्ग अशी संरचना निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने अधिकारांचे विकेंद्रीकरण व प्रशासकीय गतीमानतेच्या दृष्टीकोनातुन शासन निर्णय दिनांक १५मार्च, २०२४ अन्वये इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गास ५ वी चा वर्ग व इयत्ता १ ली ते ७ वी च्या वर्गास ८ वी चा वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडण्यास मान्यता प्रदान सक्षम प्राधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/आयुक्त, महानगरपालिका यांना घोषित करण्यात आले आहे.

(४) व (५) जून, २०२४ पासून सिंदुधुर्ग जिल्ह्यातील एकूण ७ जिल्हा परिषदेच्या शाळांना, इयत्ता ५ वी चा वर्ग व १ जिल्हा परिषदेच्या शाळेस इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे तसेच अधिकारांचे विकेंद्रीकरणामुळे जिल्हा परिषद शाळांना आवश्यकतेनुसार इयत्ता ५वी, इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्याची कार्यवाही सुरु

आहे.

राज्यातील खासगी व अन्य मंडळाच्या शाळांमधील शुल्क वाढीबाबत

(१७) ८२८८ (१९-०८-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी तसेच राज्य मंडळ, सीबीएसई, आयसीएसई इत्यादी मंडळांच्या शाळांमध्ये मनमानी शुल्क वाढीमुळे पालक वर्ग त्रस्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांकडून करण्यात येणाऱ्या शुल्कवाढीविरोधात दाद मागण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) कायदा, २०११ अन्वये राज्यातील आठ विभागीय ठिकाणी उपसंचालक स्तरावर विभागीय शुल्क नियामक समित्या कार्यरत असण्याची तरतूद असताना सध्या एकही समिती कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक खासगी शाळांनी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ मधील तरतुदींना बगल देऊन वाटेल त्या प्रमाणे शुल्क वाढ केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शाळांकडून होणाऱ्या मनमानी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१४-११-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम ७ अन्वये राज्यातील प्रत्येक शैक्षणिक विभागात सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली विभागीय शुल्क नियामक समिती घटीत करण्यात येते. या समितींचा पदावधी पूर्ण झाला असल्याने सध्या या समित्याचे अध्यक्ष पद रिक्त आहे. परंतु रिक्त पदे भरतीची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ मधील तरतुदींना बगल देऊन शुल्क वाढ केल्याबाबत शासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणा-या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरीता असलेल्या महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम ५ व ६ अन्वये राज्यातील शाळांकडून आकारण्यात येणारे शुल्क निश्चित केले जाते. सदर अधिनियमात सुधारणा करण्याचे विभाग स्तरावर प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत

(१८) ८४४६ (०८-०९-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ६३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,**

तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील दुष्काळग्रस्त परिस्थिती व पाणी टंचाईचे निराकरण करण्यासाठी गोसिखुर्द प्रकल्पातील अतिरिक्त पाणी पश्चिम विदर्भातील दुष्काळग्रस्त भागात वळविण्याच्या अनुषंगाने वैनगंगा व नळगंगा नदीजोड प्रकल्प राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीजोड प्रकल्पातंर्गत कोणकोणती कामे करण्यात येणार आहेत, तसेच यामुळे किती जलसाठा उपलब्ध होणार आहे व त्याचा विनियोग कशाप्रकारे करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प किती माध्यमात विभागाला जाणार आहे, त्याकरिता किती निधीची शासनाने मान्यता दिली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त नदीजोड प्रकल्पामुळे पश्चिम विदर्भातील किती व कोणकोणत्या जिल्हयांना त्याचा फायदा होणार आहे, तसेच पाणी साठयापैकी उद्योगाकरीता व पिण्याच्या पाण्याकरीता किती पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे,

(५) असल्यास, सदर वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२१-११-२०२५) : (१) होय.

शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट, २०२४ नुसार रु.८७३४२.८६ कोटी किंमतीस तत्वतः प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे व भाग-१ मधील कामाकरीता रू.१२३२.०६ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत रू. ८८५७४.९२ कोटी आहे.

(२) या नदीजोड प्रकल्पा अंतर्गत प्रशासकीय मान्यतेनुसार भाग-१ मधील कामाकरीता १२३२.०६ कोटी रक्कमेस सर्वेक्षण अन्वेषण संकल्पन व प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास मान्यता करणे तसेच वैधानिक मान्यता या कामाचा समावेश आहे.

वैनगंगा नळगंगा नदीजोड योजनेद्वारे गोदावरी खो-यामधील प्राणहीता उपखोऱ्यातील वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द ह्या राष्ट्रीय प्रकल्पाचे जलाशयातुन पुराचे १७७२ दलघमी अतिरीक्त पाणी पावसाळयात उचल करुन बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पापर्यंत आणण्याचे नियोजित आहे. त्याव्दारे कालवा मार्गाच्या दोन्हीबाजुस नवीन धरणांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील धरणांमध्ये हे पाणीसाठवुन सिंचना करीता तसेच बिगर सिंचनासाठी वापराण्याचे प्रस्तावित आहे. मंजूर प्रशासकीय मान्यतेनुसार योजनेचे लाभक्षेत्र ३,७१,२७७ हे. आहे. प्रारुप सविस्तर अहवालानुसार योजनेचे लाभक्षेत्र ४,०४,२८१ हे. प्रस्तावित आहे. त्यानुसार जिल्हानिहाय प्रस्तावित लाभक्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

नागपूर जिल्हा ८४७०८ हे, भंडारा ११८९० हे. वर्धा जिल्हा ७०५७८ हे, अमरावती जिल्हा ९२४३० हे. यवतमाळ १६११५ हे.अकोला ६९८२१ हे. बुलढाणा ४२९११ हे. व वाशीम १५८२८ हे. चा समावेश आहे.

(३) ही योजना तीन टप्प्या मध्ये विभागलेली आहे.

टप्पा-१ गोसीखुर्द ते निम्न वर्धा धरण १४६.६१ किमी लांबी,

टप्पा-२ निम्न वर्धा धरण ते काटेपूर्णा धरण १२६.९५ किमी,

टप्पा-३ काटेपूर्णा धरण ते नळगंगा धरण ११४.७२ किमी.

(४) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशीम या ८ जिल्ह्यांना फायदा होणार आहे. सदर योजने अंतर्गत १७७२ दलघमी पाणीवापर प्रस्तावित आहे.त्यापैकी सिंचना करीता -१३०४.७९ दलघमी उद्योगाकरीता-१५१.१९ दलघमी व पिण्याचे पाण्याकरिता ७७.८६ दलघमी असा पाणीवापर प्रस्तावित आहे.

(५) सदर वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट, २०२४ नुसार रु.८७३४२.८६ कोटी किंमतीस तत्वतः प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने प्राथमिक कामे सर्वेक्षण, जलशास्त्रीय अभ्यास, अन्वेषण संकल्पने सरेखा कामाची अंदाजपत्रके इ. कामाची निविदा काढण्यात आली असून सदर कामाचे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून रा.ता.सं.सं. व म.ज.नि.प्रा., वैधानिक मान्यता घेण्याचे काम अंतर्भुत आहे.

वि.स. २० (14)

विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. प्रारुप प्रकल्प अहवाल तपासणीस्तव रां.ता.स.स, अमरावती यांना सादर आहे.

मानवत शहरासाठी पाणी आरक्षण करणेबाबत

(१९) ८६६९ (२४-०७-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर दुधना प्रकल्पातील पाणी सन २०५७ पर्यंत आरक्षित करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडे सन २०२५ मध्ये लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवर सचिव यांनी कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभाग छत्रपती संभाजीनगर यांना अहवाल सादर करणेकरिता कारवाई करण्याबाबतच्या सूचना दिल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या सुचनेप्रमाणे प्रत्यक्षात पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

महामंडळ कार्यालयाचे निर्णय क्र.सिंचन शाखा-१/मानवत शहर पाणी पुरवठा योजना, ता.मानवत, जि.परभणी/१११४/३६/२०२५, व क्र.गोमपाविम/सिंचन-१/धा-३६४/२०२५/६८४८, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ अन्वये निम्न दुधना प्रकल्पातुन एकुण २.१२ द.ल.घ.मी. (पिण्यासाठी व वाणिज्य वापरासाठी) पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शाळांमध्ये कायमस्वरुपी शिपाई पदे भरण्याबाबत

(२०) ८९०३ (१९-०८-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत: आणि पूर्ण अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय घेतला असून त्यामध्ये शिपाई पदाचा समावेश नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांमधील शिक्षकेतर आणि लिपिक पदाशी निगडीत नसलेली कामे करण्यात महत्वाचा घटक असलेल्या शिपायांची पदे चार वर्षांपूर्वीच्या शासन निर्णयानुसार फक्त कंत्राटी पध्दतीने भरण्याचे निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी पध्दतीने होणाऱ्या भरतीत काम करणारे व्यक्ती किती दिवस सेवेत राहतील आणि कितपत जबाबदारीने काम करतील अशी शंका महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघटनेचे माजी उपाध्यक्ष तसेच बृहन्मुंबई मुख्याध्यापक संघटना यांनी प्रश्न उपस्थित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चार वर्षापूर्वी घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करुन, त्याऐवजी कायमस्वरुपी शिपायांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१३-११-२०२५) : (१) व (२) वित्त विभाग व उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने शासन निर्णय दिनांक ११.१२.२०२० अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त सर्व खाजगी अनुदानित/अशंतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक चतुर्थश्रेणी (शिपाई, नाईक, पहारेकरी, रात्रीचा पहारेकरी, सफाईगार, कामाठी, तेलवाला, हमाल, परिचर, चौकीदार, प्रयोगशाळा परिचर इ.) कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध लागू करण्याऐवजी विद्यार्थी पटसंखेच्या आधारे प्रतिशाळा "शिपाई भत्ता" लागू करण्यात आलेला आहे.
(३) व (४) दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांतील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनासंदर्भात सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरहू शासन निर्णयानुसार शाळा स्तरावर, केंद्र स्तरावर व तालुका स्तरावर 'सखी सावित्री समिती' व राज्य स्तरावर आयुक्त, शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा संनियंत्रण समिती' स्थापन करण्याची तसेच प्रत्येक शाळा व शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच, सदरहू शासन निर्णयान्वये प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची (नियमित / बाह्यस्त्रोताद्वारे अथवा कंत्राटी पध्दतीने) नियुक्ती करताना त्यांची पार्श्वभूमी, पूर्वीची सेवा, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी याची पडताळणी करून, नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे, नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणेकडे देणे, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणीकरिता क्राइम ॲन्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम्ससारख्या तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजनांचा वापर करणे, नेमणुकीनंतर एखाद्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी ही फौजदारी गुन्ह्याशी संबंधित असल्याचे निदर्शनास आल्यास, त्यास तात्काळ सेवेतून कमी करुन त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच शाळेने याबाबत विहित बाबींची पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई करता येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यापन वर्ग सुरू करण्याबाबत

(२१) ९०५१ (०८-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना विद्यापीठ, जिल्हा गडचिरोली येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यापन वर्ग सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ यांना माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अध्यापन वर्ग सुरू करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, अध्यापन वर्ग स्थापन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-१०-२०२५) : (१) होय.
(२) अधिसभेच्या दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजीच्या सभेमध्ये विद्यापीठाच्या साधारण निधीतून अध्यासन सुरु करण्याचा ठराव पारीत करण्यात आला. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सर्व शाळांमध्ये आयटी लॅब व स्मार्ट क्लासरुम उपलब्ध करुन देण्याबाबत

(२२) ९०६५ (०८-०९-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सरकारी ६५ हजार शाळांपैकी १,३३१ शाळांमध्ये इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नालॉजी लॅब, तर १,५७८ शाळांमध्ये स्मार्ट क्लासरुम उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा, यासाठी इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा, सर्व वैज्ञानिक साहित्य बंधनकारक असल्याचे शासनाचे धोरण असतांना राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विज्ञान, भौतिक, जीवशास्त्र, रसायनशास्त्र यांच्या प्रयोगशाळा शाळांमध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागाच्या वार्षिक कार्य नियोजन अंदाजपत्रक अहवालात प्रलंबित कामांमध्ये सदर बाब स्पष्ट करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये आयटी लॅब व स्मार्ट क्लासरुम उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) समग्र शिक्षा योजना प्रकल्प अंमलबजावणी समितीची दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद आहे.
(४) केंद्र शासनाच्या आयसीटी मार्गदर्शक सूचनांमधील निकषानुसार आयसीटी लॅब व स्मार्ट क्लासरूम उपलब्ध करून

देण्यासाठी केंद्र शासनाकडे अतिरिक्त पुरवठा मागणी करण्यात आली असता, ८५१ शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम व ८३९ शाळांमध्ये आयसीटी लॅबची निर्मिती करण्यासाठी मंजूरी प्राप्त झाली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिक्षणसेवक पदाचा कालावधी रद्द करून थेट नियुक्ती व पूर्ण वेतनाबाबत

(२३) ९८९२ (०८-०९-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक वर्षांपासून सुरू असलेला शिक्षणसेवक पदाचा कालावधी रद्द करून नवनियुक्त शिक्षकांना थेट नियुक्ती देऊन पूर्ण वेतन देण्यात यावे या मागणीचे निवेदन शिक्षणसेवकांनी माहे मे, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डी.एड, बी.एड, टीईटी अशा परीक्षा उत्तीर्ण करून पात्रता सिध्द केलेल्या शिक्षकांना पुन्हा तीन वर्षांचा सेवाकाल प्रशिक्षण म्हणून लावण्यात येत असून त्यामुळे अत्यल्प मानधनावर उदरनिर्वाह करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर राज्यांमध्ये शिक्षकांना थेट नियुक्ती दिली जात असून केवळ महाराष्ट्रातच शिक्षणसेवक पदाचा कालावधी लागू असल्याने सदर कालावधी रद्द करून थेट नियुक्ती व पूर्ण वेतन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) शिक्षण सेवक योजनेंतर्गत निवड झालेल्या शिक्षकास ठोक मानधनावर ३ वर्षांकरीता नियुक्ती देण्यात येते. या कालावधीत त्याने पार पाडलेल्या कामगीरीचे यथोचित मुल्यमापन करुन त्यास सेवेत नियमित करण्यात येते. एका प्रकारे हा शिक्षक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी आहे. शिक्षण सेवक योजनेमुळे उमेदवारांच्या शिक्षक पदावरील नियमित नियुक्तीस बाधा पोहोचत नाही. शिवाय शिक्षण सेवक पदावरील सेवा वरीष्ठ वेतनश्रेणीकरीता व सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात येत असल्याने एकूण अर्हताकारी सेवेच्या कालावधीवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. तसेच शासन निर्णय दिनांक ०७.०२.२०२३ अन्वये या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.सद्य:स्थितीत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना अनुक्रमे रुपये १६,०००/-, रुपये १८,०००/- व रुपये २०,०००/- इतके ठोक मानधन अदा केले जाते. या सर्व बाबी तसेच संभाव्य वित्तीय भार विचारात घेता, शिक्षण सेवक योजना रद्द करता येणार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

खाशाबा जाधव आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलातील इनडोअर हॉलचा वापराबाबत

(२४) ९९५७ (०८-०९-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या २७ एकर क्षेत्रामध्ये उभारण्यात आलेल्या खाशाबा जाधव आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा संकुलातील इनडोअर हॉलचे उद्घाटन दिनांक ५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे सदर इनडोअर हॉलचा वापर खेळाडूंच्या सरावासाठी न होता इतर शासकीय व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी केला जात असून, याबाबत क्रीडाप्रेमी, खेळाडू व सिनेट सदस्यांनी आक्षेप नोंदवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हॉलमध्ये बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, टेबल टेनिस, कुस्ती, ज्युडो इत्यादी क्रीडाप्रकारांचा नियमित सराव होण्याऐवजी, पदवीप्रदान समारंभ, विद्यापीठ वर्धापन दिन, G-२० कार्यक्रम, परीक्षा व इतर सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर हॉलमध्ये कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेले दर्जेदार वुडन फ्लोरिंग सततच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे खराब होण्याची शक्यता असून, यामुळे खेळाडूंना गंभीर दुखापतींचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर इनडोअर हॉलचा वापर फक्त क्रीडा प्रशिक्षण व स्पर्धांसाठी मर्यादित ठेवावा, यासाठी सिनेट सदस्यांनी अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विशेष क्रीडा स्पर्धा आयोजनाची मागणी केली आहे तसेच हॉलचा इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी वापर होऊ नये, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-११-२०२५) : (१)होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्नामध्ये नमूद केलेल्या खेळांचा सराव व स्पर्धादेखील नियमितपणे आयोजित केले जात आहेत.

(४) नाही, हे खरे नाही. अद्यापपावेतो वुडन फलोअरिंग खराब झाले नाही अथवा कोणासही दुखापत झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कबड्डी (मुले-मुली) क्रिडा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदरील बाब ही विद्यापीठाच्या अखत्यारीतील असल्यामुळे सदर इनडोअर हॉलचा वापर इतर कोणत्याही कार्यक्रमाकरिता होऊ नये याबाबत विद्यापीठ स्तरावरुन दक्षता घेतलेली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

चिंचोली सोन (ता.औसा, जि.लातूर) निम्न तेरणा प्रकल्पातील पाणी बेलकुंड येथे अतिरिक्त एमआयडीसीसाठी आरक्षित करणेबाबत

(२५) १०१३२ (२३-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलकुंड चिंचोली सोन (ता.औसा, जि.लातूर) येथील निम्न तेरणा प्रकल्पातील अतिरिक्त पाणी एमआयडीसीसाठी आरक्षित करणेबाबत उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ उप विभाग, लातूर यांनी कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग क्र.१ लातूर यांच्याकडे दिनांक १३ मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील एमआयडीसीसाठी पाणी आरक्षण मंजुरीसाठी किती कालावधी लागेल,

(३) असल्यास, सदरील पाणी आरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ उपविभाग, लातूर यांनी या प्राधिकरण कार्यालयांतर्गत असलेल्या कार्यकारी अभियंता, लातुर पाटबंधारे विभाग क्र.१, लातुर या विभागीय कार्यालयास दिनांक १३ मार्च, २०२५ मध्ये पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.

(२) व (३) सदर प्रस्ताव कार्यकारी अभियंता, लातुर पाटबंधारे विभाग क्र.१, लातुर या विभागीय कार्यालयांतर्गत उपविभागीय स्तरावर तपासून पाहिला असता त्यामध्ये त्यांना त्रुटी असल्याबाबत निदर्शनास आले. त्यानुषंगाने सदरील त्रुटी पूर्तता करण्याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) एम.आय.डी.सी विभाग लातूर यांना दिनांक ०७ मे, २०२५ रोजी च्या पत्रान्वये कळविले होते. तसेच दिनांक २० ऑगस्ट, २०२५ व दिनांक १० सप्टेंबर, २०२५ या पत्रान्वये पुन:श्च कळविण्यात आले आहे. तरी अद्यापपर्यंत यांच्याकडून फेर प्रस्ताव सादर झालेला नाही.

तरी सदरील परिपूर्ण प्रस्ताव त्रुटीपुर्ततेसहित प्राप्त होताच मंजुरीची पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

टुकूर (खांडेपारगाव) (ता.जि.बीड) साठवण तलाव प्रकल्पा ऐवजी बीड तालुक्यात प्रस्तावित ९ कोल्हापूरी बंधाऱ्यांना फेर नवीन प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

(२६) १०२२० (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टुकूर (खांडेपारगाव) (ता.जि.बीड) साठवण तलाव प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश सन २००३ रोजी पारीत झालेले असून प्रकल्पाची एकूण किंमत भूसंपादनासह रुपये १६ कोटी इतकी होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थिती सदर प्रकल्पाची किंमत किमान ३५० कोटी रूपयांवर जात असून आसपासच्या व सदरील गावातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे व गैरसोयीमुळे प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्रशासनाकडून रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प रद्द होत असतांना त्याऐवजी एकूण ९ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे होण्यासाठी सुधारित सूचना प्रसारित करुन या बंधाऱ्यांच्या प्रकल्पामुळे १.७४ द.ल.घ.मी पाणीसाठा उपलब्ध होवून सिंचन क्षेत्र ३९० हेक्टर ओलीताखाली येणार आहे, त्यासाठी २२० कोटीच्या दरम्यान प्रशासकीय खर्च लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रद्द झालेल्या साठवण तलावाच्या ऐवजी त्याजागी ९ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यास आसपासच्या गावातील शेतकऱ्यांची शेती विषयक व पाण्याची अडचण दूर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पासाठी यापूर्वी देखिल शासनाकडून निधी वितरित झाला आहे, यासाठी फेर नवीन प्रशासकीय मान्यता देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-१०-२०२५) : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

टुकूर (खांडेपारगांव) साठवण तलावाची प्रशासकीय मान्यता किंमत रु.१६.०६ कोटी ही सन २००२-०३ च्या दरसूचीवर आधारीत असून सन २०२३-२४ च्या चालु दरसूचीनुसार ही अंदाजीत किंमत रु.३७८ कोटी इतकी येत आहे.

प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता व निविदा सद्य:स्थितीत शासनाकडून रद्द करण्यात आलेली नाही.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या ठिकाणी व त्याच्या वरील बाजूस भौगोलिक परिस्थिती पाहता, निम्न पातळी बंधाऱ्यांसाठी आवश्यक इतकी उंची उपलब्ध होत नसल्याने याऐवजी प्रकल्पाच्या खालील व वरील बाजूस २ ते ३ मी. उंचीचे ९ को.प.बंधारे प्रस्तावीत करण्यात आलेले आहेत. या बंधाऱ्यांमुळे ०.६९ द.ल.घ.मी. साठवण क्षमता निर्माण होत असून एकूण १४७ हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. यासाठी चालू दरसूचीनुसार ९ को.प. बंधाऱ्यांची अंदाजीत किंमत रु.४८.७७ कोटी येत आहे.

(४) होय.

(५) होय.

(६) प्रकल्पाच्या फेर नियोजनातून ९ को.प.बंधाऱ्याचे बांधकाम करण्याचा सुप्रमा प्रस्ताव तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यांच्याकडून उपस्थित त्रुटीची पूर्तता क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

नागपूर विद्यापीठातील प्रभारी अधिकाऱ्यांची नियुक्तीमुळे प्रशासकीस कामात अडचणी येत असल्याबाबत

(२७) १०२८६ (०८-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात गेल्या अनेक वर्षांपासून कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक इत्यादी महत्त्वाच्या पदांवर प्रभारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजात व शैक्षणिक धोरणांवर नकारात्मक परिणाम होत असून महत्वपूर्ण निर्णयही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि प्रशासकीय कामकाज सुरळीत करण्यासाठी सर्व रिक्त पदांवर कायमस्वरूपी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच किती कालावधीत नियुक्ती केली जाईल,

(३) असल्यास, नागपूर विद्यापीठातील महत्त्वाची पदे प्रभारी अधिकाऱ्यांवर चालवली जाणार नाहीत याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-११-२०२५) : (१), (२), (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिव पदी डॉ. राजू हिवसे हे कार्यरत आहे. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ आणि संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदांचा अतिरिक्त प्रभार इतर संबंधीत अधिकाऱ्यांकडे क्रमशः दिनांक २ मे, २०२५ व दिनांक ९ सप्टेंबर, २०२४ पासून सोपविण्यात आलेला आहे. सदरील रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात दिनांक २ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली असून पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

न्यू इंडिया को -ऑप. बँकेतील ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण होण्याबाबत

(२८) १०४२९ (२४-०७-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यू इंडिया को-ऑप. बँकेवर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजीपासून असलेल्या निर्बंधामुळे ठेवीदार आर्थिक अडचणीत सापडल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने सध्या प्रत्यक्षात रुपये २५००० इतकी रक्कम काढण्याची असलेली मर्यादा वाढवून ती रुपये १.५ लाख इतकी करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बँकेचे पुनरुजीवन होऊन बँकेच्या विलीनिकरणाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (३१-१०-२०२५) : (१), (२) व (३) न्यु इंडिया को-ऑप बँक लि., मुंबई ही संस्था बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ अन्वये नोंदणी झालेली बहुराज्यीय सहकारी संस्था असून ती मा. केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अधिकार व नियंत्रण कक्षेत येते. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४ (४) अन्वये लवाद नियुक्त करणे व कलम १०८ अन्वये संस्थेची तपासणी करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही वैधानिक अधिकार राज्याच्या निबंधकास नाहीत. बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र व गुजरात या राज्यात असुन बँकेच्या एकुण शाखा २८ आहेत. बँकेने दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ पासुन ठेवीदारांना फक्त रु. २५,०००/- काढण्याची परवानगी देण्यात आली असून त्यानुसार आतापर्यंत एकुण ३०,१३८ ठेवीदारांना रु. ५६.५१ कोटी वाटप केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यात लघुपाटबंधारे विभागामार्फत अनेक कामे प्रलंबित असल्याबाबत

(२९) १०९१६ (१९-०८-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यात लघुपाटबंधारे विभागामार्फत गेल्या ३ वर्षांपासून अनेक कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन-चार कामे सुरू करताना त्या कामाच्या भूमिपूजनासाठी लोकप्रतिनिधींना बोलावले जात नाही व त्यांना विश्वासात देखील घेतले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच गत ५ वर्षांपासून अनेक कामे अर्धवट असून त्या कामांची पूर्ण देयके काढून घेऊनही सदर कामे पूर्ण केली नसून नवीन कामे सुरू केली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या व अर्धवट कामांची देयके काढून कामे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२०-११-२०२५) : (१) अंशत. खरे आहे.

अ) रामपूर मध्यम प्रकल्प, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार या जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील रामपूर ल.पा. योजना प्रकल्पास दिनांक ११/१२/१९८० रोजी प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता (किंमत रु.३९.७३ कोटी) मिळालेली आहे. प्रकल्पाचे जवळपास ७५% काम पूर्ण करणेत आलेले असून मागील ३ वर्षांत सांडव्याचे ५०%, EDA चे पूर्ण तसेच विमोचकाचे ९०% काम पूर्ण केलेले आहे व उर्वरीत कामे पुढील १ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
ब) देहली मध्यम प्रकल्प, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार प्रकल्पाबाबत अशी बाब उद्भवलेली नाही.
(२) नाही.
प्रकल्पाची नवीन कामे सुरु करतांना भूमीपूजनासाठी मा. लोकप्रतिनिधी यांना बोलविणेबाबत कार्यवाही करण्यात येते.
(३) नाही.
अ) रामपूर मध्यम प्रकल्प, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार प्रकल्पाचे काम भौतिकदृष्ट्या ७५ टक्के पूर्ण असून, प्रकल्पाच्या निविदेअंतर्गत आतापर्यंत झालेल्या कामाचे पूर्ण देयक कंत्राटदारास अदा केलेले नाही. तसेच नवीन कामे सुरु केलेली नाहीत. त्यामुळे प्रकल्पाबाबत अशी बाब उद्भवलेली नाही.
ब) देहली मध्यम प्रकल्प, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार प्रकल्पाबाबत अशी बाब उद्भवलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीएलओ कामांतून शिक्षकांना मुक्त करण्याबाबत

(३०) ११०२२ (२४-०७-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांना बीएलओ ची कामे दिली जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीएलओची कामे शिक्षकांना सोपविण्यामागील हेतू काय असून, बीएलओ कामांतून राज्यातील सर्व शिक्षकांची मुक्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) बालकाचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ मधील कलम २७ अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधीमंडळ व संसद यासाठी होणाऱ्या निवडणूकांची कामे ही करावी लागणारी अनिवार्य कामे म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. यास्तव शिक्षकांना बीएलओचे काम देण्यात येत असते. तसेच शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २३.०८.२०२४ अन्वये अशैक्षणिक कामांचे वर्गीकरण केले असून, सदरची कामे शिक्षकांना न देण्याबाबतचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. बीड (नवजीवन शिक्षक सह.पतसंस्था) भरती प्रक्रियेतील गैरव्यवहाराबाबत

(३१) ११०७७ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. बीड येथे कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील संस्थेने लिपिक भरती करत असतांना व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी ठराव क्र.११ ने दाखविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.बहिर निखिल श्रीराम यांची नियुक्ती "कनिष्ठ लिपिक" ऐवजी थेट "वरिष्ठ लिपिक" पदावर करुन संस्थेच्या नियमावलीमध्ये नमूद असलेल्या बाबी वापरात न आणता सदरील कर्मचाऱ्यांने संस्थेच्या सेवेत सलग दोन वर्ष पूर्ण वेळ समाधानकारक सेवा केल्यानंतर कायम करणे व त्यानंतर त्याला पदोन्नती दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर लिपिकाची शैक्षणिक पात्रता न तपासता संबंधितांस वरिष्ठ लिपिक या पदावर जाहिरातीने दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी देणे तसेच संस्थेचा आदेश दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ रोजी देणे व उपनिबंधक सहकारी संस्था (ता.बीड) यांचा आदेश दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास देण्यात आलेला असणे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त नियुक्ती होत असतांना नियुक्ती धारकाचे वडिल संस्थेचे त्यावेळी व आजरोजी देखिल चेअरमन असणे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन चुकीची नियुक्ती व पदोन्नती देणाऱ्या संचालक मंडळावर व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (३१-१०-२०२५) : (१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) अंशत: खरे आहे. संस्थेने दिनांक ०६ ऑक्टोंबर, २०२३ ला पदभरतीबाबत जाहिरात देऊन पदभरती केली व त्यास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ ला मान्यता दिली.

(५) होय.

(६) सदर पदभरती संस्थेच्या कर्मचारी सेवानियमाच्या विरूद्ध असल्याने श्री.बहिर निखिल श्रीराम यांना वरिष्ठ लिपीक या पदावर दिलेली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात यावी व त्यांना दिलेले वेतन व भत्ते वसुल करावे असे निर्देश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ अन्वये दिनांक २४ जून, २०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दिले आहेत. सदर आदेशाविरूद्ध संस्थेच्या संचालक मंडळाने मा.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या प्राधिकरणा समोर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ अन्वये दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी अपिल दाखल केले आहे. सदरचा अपिल अर्ज मा.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या प्राधिकरणासमोर न्यायप्रविष्ट आहे.

शिक्षक संचमान्यतेसाठी शाळेतील आधार व्हेरिफाइड विद्यार्थ्यांची संख्या गृहीत धरण्यात येणार असल्याबाबत

(३२) ११०९० (०८-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता शिक्षक संचमान्यता ऑनलाईन पोर्टलवर प्रसारित करण्यात आली असून, सदर मंजुरीसाठी शाळेतील आधार व्हेरिफाइड विद्यार्थ्यांची संख्या गृहीत धरत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, (ता वणी जि. यवतमाळ) येथील अनेक विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नसल्यामुळे किंवा आधारवरील माहिती आणि शालेय प्रवेश निर्गमावरील माहितीमध्ये विसंगती असल्यामुळे सुमारे ९८ टक्के विद्यार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वणी तालुक्यातील शिक्षक मंजुरीवर परिणाम होऊन शिक्षकांची संख्या कमी होण्याची व त्यामुळे

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात जाण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या विद्यार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) याबाबत संचालनालय स्तरावरून कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

भामा आसखेड, चास कमान आणि कळमोडी धरण बुडीत क्षेत्रातील बंधारे प्रकल्पांबाबत

(३३) १११५६ (२४-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड, चास कमान आणि कळमोडी या धरणांच्या बुडीत भागात बुडलेल्या बंधाऱ्यांचे किंवा बॅरेजचे नियोजन, डिझाइन आणि बांधकाम करण्यासाठी शासनाचा निधी वाटप करण्याचा प्रस्ताव आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्यांमुळे नदीपात्रात करण्यात आल्याने धरणाच्या बुडीत पाणी क्षेत्रात कुठलाही बदल होणार नसून धरणाचा मृत साठा हा या बुडीत बंधाऱ्यात समायोजित होईल काय, तसेच मूळ नदीपात्र खोलीकरण करून बुडीत बंधारा पाणी साठा वाढवता येऊ शकतो काय,
(३) असल्यास, याबाबत निरी संस्थेकडून अभ्यास करून प्रस्ताव तयार होईल काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाचा अंदाजे खर्च किती आहे आणि प्रकल्पग्रस्त समुदायांना कोणते फायदे मिळतील, तसेच प्रकल्पग्रस्त समुदायांना प्रकल्पातून पुरेसा मोबदला, पुनर्वसन आणि फायदे मिळावेत यासाठी कोणती उपाययोजना केली, त्याच धर्तीवर बुडीत बंधारे देखील त्याचाच एक भाग मानला जाईल काय,
(५) असल्यास, राज्यात किती बुडीत बंधारे किती ठिकाणी मंजूर झाले आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) : (१) बुडीत बंधाऱ्यांबाबत पर्याय सुचविणे व बांधकामे हाती घेणे याबाबत जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक २२ जानेवारी, २०२५ अन्वये समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

तसेच कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करणेबाबत ही शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर, २०२२ नुसार समिती स्थापन करणेत आली आहे. को. प. बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणातील संख्या विचारात घेता, प्राधान्याने कोणत्या को. प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करणे आवश्यक आहे, याबाबत समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

आर. टी. ई. प्रवेश प्रक्रिया इयत्ता १० वी पर्यंत लागू करण्याबाबत

(३४) ११२६६ (०८-०९-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर. टी. ई. अधिनियमांतर्गत सध्या २५ टक्के विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत लागू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हीच प्रवेश प्रक्रिया इयत्ता १० वी पर्यंत लागू करण्याची आवश्यकता असून यासंदर्भात शासनाकडे विविध स्तरांवरून मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर.टी.ई. अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रिया इयत्ता १० वी पर्यंत लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०६-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्याची तरतूद केलेली आहे. त्यानुसार, वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना या अधिनियमामधील कलम १२ (१) (c) नुसार खाजगी विनाअनुदानित शाळांमधील प्रवेशाच्या २५ % जागांवर मोफत शिक्षण दिले जाते.

तसेच, शासन निर्णय, दिनांक १३ जून, १९९६ अन्वये मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये १० वी पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते. तर, शासन निर्णय, दिनांक ०६ फेब्रुवारी, १९८७ अन्वये मुलींना शासकीय व अशासकीय मान्यताप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कामधेनु मजुर संस्था व जयक्रांती मजुर संस्थेच्या गैरव्यवहाराबाबत

(३५) ११५९७ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामधेनु मजुर संस्था व जयक्रांती मजुर संस्था या दोन्ही मजुर संस्थेने शासनामार्फत विविध लेखाशिर्षांतर्गत प्रशासकीय मान्यतेच्या आधारे कार्यारंभ आदेशासहित कामे स्वत:च्या संस्थेवर अवगत केलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कामे दोन्ही मजुर संस्थेला मिळाल्यानंतर संस्थेने सर्व मजुरांना विश्वासात घेवून व शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार कामे करणे गरजेचे असताना संस्थेने कामांचा निकृष्ट दर्जा राखून काम न करताच कामाची देयके घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मजुरांना या बाबीची कोणतीही कल्पना देण्यात आलेली नसून उक्त दोन्ही संस्थेची कामनिहाय, संचिकानिहाय, देयकेनिहाय, इन्कम टॅक्स, जीएसटी, सर्व कार्यालयाची एनओसी, मजुरांचा अहवाल या व इतर सर्व बाबींचा समावेश करुन चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त चौकशीचा कालावधी सन २०२१ ते ऑगस्ट २०२४ असा ग्राह्य धरण्यात येवून चौकशी विभागामार्फत अथवा त्रयस्त समितीमार्फत करण्याबाबतची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे

काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (१९-११-२०२५) : (१) नाही.
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांचेमार्फत विविध लेखाशिर्षांतर्गत प्रशासकीय मान्यतेच्या आधारे केल्या जाणाऱ्या कामांसाठी, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे अध्यक्षतेखालील कामवाटप समितीकडून, कामांचे वाटप करून पात्र मजूर सहकारी संस्थांची शिफारस करण्यात आली आहे. सदर संस्थांच्या यादीमध्ये कामधेनु मजुर संस्था व जयक्रांती मजुर संस्था या दोन संस्थांचाही समावेश आहे. काम वाटप झाल्यानंतर संबधीत विभागाकडून कार्यारंभ आदेश देणे, काम पूर्ण करुन बीले अदा करण्याची कार्यवाही केली जाते.
(२) नाही.
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्या दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजीच्या अहवालानुसार, कामधेनु मजुर सहकारी संस्था व जयक्रांती मजुर सहकारी संस्था यांना सन २०२१ ते ऑगस्ट, २०२४ या कालावधीत काम वाटप करण्यात आले असून, त्यांच्या कामांचा दर्जा मानकाप्रमाणे राखल्याने व कामाचे चाचणी निष्कर्ष तपासून, कामधेनू मजूर सहकारी संस्थेची देयके अदा करण्यात आली आहेत व जयक्रांती मजूर सहकारी संस्थेची देयके अदा करण्याची कार्यवाही संबंधित विभाग स्तरावर करण्यात येत आहे.
(३) व (४) होय.
मजुर संस्थेकडुन निकृष्ट दर्जाची कामे झाल्याबाबत तथा कामे न करता देयके उचलुन अपहार झालेबाबत मा. श्री. संदिप क्षीरसागर, विधानसभा सदस्य यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२४, दिनांक २२ डिसेंबर, २०२४ व दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ च्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.क्र.१ व २, बीड व कार्यकारी अभियंता, बां.वि.क्र. १ व २, जिल्हा परिषद, बीड व मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांचेकडे तक्रार केली आहे.
(५) मा. विधान सभा सदस्य यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने कामधेनू मजूर सहकारी संस्था मर्यादित, साखरे बोरगाव व जयक्रांती मजूर सहकारी संस्था मर्यादित, बहीरवाडी ता. जि. बीड यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असता, सदर दोन्ही संस्था जी.एस.टी. व इन्कम टॅक्स नियमित भरणा करीत असून, सदर संस्थांच्या सन २०२१ ते २०२५ अखेरच्या लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदविलेला नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.
तसेच, कार्यकारी अभियंता, बीड यांच्याकडून कामाच्या दर्जाबाबत व देयकांबाबत मागविलेल्या अहवालानुसार, सदर संस्थांनी कामाचा दर्जा मानका प्रमाणे राखण्यात आल्याचे नमूद केले आहे. तसेच, संदर्भीय कामाचे चाचणी निष्कर्ष व छायाचित्रे जोडून आणि रितसर कामाचे मुल्यमापन करुन देयके अदा करण्याबाबत कार्यवाही संबंधित विभागांमार्फत करण्यात येत आहे.

खेड (जि.पुणे) तालुक्यातील अल्पसंख्याक समुदायांच्या कल्याणासाठी उपाययोजनाबाबत

(३६) ११६४६ (०८-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील मुस्लिम, जैन आणि ख्रिश्चन यांसारख्या अल्पसंख्याक समुदायांची लक्षणीय वस्ती लक्षात घेता, त्यांच्या विशिष्ट गरजा व आव्हानांची ओळख पटवण्यासाठी शासनाने सर्वेक्षण किंवा मूल्यांकन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक समुदायांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक कल्याणासाठी व त्यांच्या सर्वांगीण

विकासासाठी शासनाकडून कोणत्या योजना राबविण्यात येत असून त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील अल्पसंख्याक समुदायांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगाराच्या संधी प्रभावीपणे उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अल्पसंख्याक समाजाच्या प्रलंबित विकासकामांबाबत शासनाची भूमिका काय असून अधिकृत धार्मिक स्थळांचे सर्वेक्षण करून GIS मॅपिंग करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (१३-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील अल्पसंख्याक समुदायांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरिता परदेशी शिष्यवृत्ती, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, निवासी पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम, स्पर्धा परिक्षा यांसारख्या विविध योजना विभागामार्फत राबविण्यात येतात. सदर योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पित उपलब्ध निधीच्या मर्यादेत निधी मंजूर करुन वितरित करण्यात येतो.

(४) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रविकास योजनेंतर्गत ग्रामिण तसेच नागरी क्षेत्रातील वस्तींमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता अर्थसंकल्पित उपलब्ध निधीच्या मर्यादेत विकास कामांना शासन मान्यता देण्यात येते. वक्फ मालमत्तांच्या अभिलेख्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी तसेच वक्फ मालमत्तांचे कायमस्वरुपी जतन व नोंदी करण्यासाठी राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याबाबत

(३७) १२०६९ (१९-०८-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने भंडारा जिल्ह्यातील सहा बलुतेदार सहकारी संस्थेचे कर्ज माफ झाल्यानंतर सुध्दा (एनपीए) अवैद्य घोषित करुन संस्थेचे सदस्यत्व रद्द करुन त्यांना १५ वर्षानंतर होणाऱ्या निवडणूकीचा मताधिकार हिरावल्याचे माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शासन निर्णय केव्हीबी-२००९/प्र.क्र.१४१/उद्योग-६, दिनांक २२ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयाची अवहेलना केल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (२४-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ नुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळांतर्गत कारागीर रोजगार हमी योजनेतुन राज्यातील बलुतेदार सहकारी संस्थांच्या सभासदांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातुन वाटप करण्यात आलेल्या कर्जापैकी दिनांक ३१ मार्च, २००८ अखेर थकीत असलेल्या कर्जास कर्जमाफी देण्याबाबत निर्णय झाला. त्यानुसार दिनांक ३१ मार्च, २००८ अखेर थकीत रक्कम व त्यावर ८ टक्के दराने व्याजाची आकारणी करुन बलुतेदार संस्थांना कर्जमाफी देण्यात आली. परंतु बँकस्तरावरील उर्वरीत रक्कम अद्यापही संस्थांकडे थकीत असून एन.पी.ए. झालेली आहे.

त्यामुळे बँकेच्या निवडणुक प्रक्रियेमध्ये प्रारुप मतदारयादी तयार करताना भंडारा जिल्ह्यातील सुरु असलेल्या पाच

व अवसायनातील एक बलुतेदार संस्था बँकेची कर्ज थकबाकीदार असल्यामुळे बँकेने सदर संस्थांचा प्रारुप मतदार यादीमध्ये समावेश केला नाही. त्यामुळे भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने भंडारा जिल्ह्यातील सहा बलुतेदार सहकारी संस्थेचे कर्ज माफ झाल्यानंतर सुध्दा (एनपीए) अवैध घोषित करुन संस्थेचे सदस्यत्व रद्द करुन त्यांना १५ वर्षानंतर होणाऱ्या निवडणूकीचा मताधिकार हिरावला, अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

७८ महाविद्यालयांच्या प्रलंबित अनुदानाबाबत

(३८) १२०८७ (०८-०९-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) : दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ३१९९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजी विनाअनुदानित धोरण लागू होण्यापूर्वी अस्तित्वात असलेली एकूण ७८ वरिष्ठ महाविद्यालये शासन मान्यतेने सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वी स्थापन झालेल्या शासन मान्यताप्राप्त महाविद्यालयांची शासन स्तरावर पाच वेळा तपासणी करण्यात आलेली असून या तपासणीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, शासन मान्यताप्राप्त व शासन स्तरावर पाच वेळा तपासणी झालेल्या, तसेच किमान NAAC मूल्यांकन प्राप्त वरिष्ठ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान मंजूर करून त्या संस्थांमधील सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने धोरण आखले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून किमान NAAC मूल्यांकन प्राप्त अशा पात्र महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीसंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१४-११-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्त्वावर शासन मान्यता दिलेली एकूण ८६ महाविद्यालये व २६ विद्याशाखा सुरू असल्याचा तपशील शासनास प्राप्त झालेला आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्त्वावर शासन मान्यता दिलेली महाविद्यालये, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया, विषय यांना अनुदान देणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने एकुण ४ वेळा तपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीनुसार शासनाच्या प्रचलित निकषानुसार ८६ महाविद्यालये व २६ विद्याशाखांना अनुदानासाठीचा प्रस्ताव संचालनालयाने वेळोवेळी शासनास सादर केलेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाअंतर्गत वर्गवाढ प्रस्तावाबाबत

(३९) १२१५३ (०८-०९-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी संदर्भात चौथीच्या वर्गाला पाचवीचा व सातवीच्या वर्गाला आठवीचा वर्ग सुरू करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे १४ पैकी ६ तालुक्यांतील एकूण १९ शाळांचे प्रस्ताव दाखल झाले असल्याचे दिनांक १३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रस्तावानुसार पाचवी व आठवीचे वर्ग सुरू करण्याबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, प्रस्तावित शाळांपैकी प्रत्यक्षात नवीन शैक्षणिक वर्षात किती शाळांमध्ये पाचवी व आठवीचे वर्ग सुरू करण्यात आले असून त्यासंबंधीची शासनामार्फत अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वर्गवाढ प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१३-११-२०२५) :१) अंश:त खरे आहे.

एकूण १० तालुक्यातील २२ शाळांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

(२) व (३) इयत्ता ५ वी चे १६ व इयत्ता ८ वी चे २ असे एकूण १८ वर्ग सुरु करण्यात आले आहेत.

(४) सरल पोर्टल वर वर्ग वाढ करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या सिमावर्ती गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

(४०) १२२३० (२४-०७-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व मध्यप्रदेशाच्या सिमावर्ती गावांमध्ये बावनथडी नदीचे पात्र कोरडे पडल्याने पाणीटंचाई निर्माण झाली असून तेथील ग्रामस्थ आंदोलने करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतपीके धोक्यात आली असून पाणी मिळणेही कठीण झाले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन मध्यप्रदेश सरकारच्या समन्वयाने बावनथडी नदीत राजीव सागर धरणातील पाणी तातडीने सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-११-२०२५) : (१) व (२) होय, अंशतः खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयीन पत्र क्र. कक्ष/जिकाभं/ संकीर्ण-२/पाणी टंचाई/७३५/२०२५, दिनांक २२ एप्रिल, २०२५ अन्वये, जिल्हाधिकारी, बालाघाट (मध्य प्रदेश) यांना बावनथडी नदीत राजीव सागर धरणातील ३.०० दलघमी पाणी सोडणेबाबत कळविण्यात आले व त्यानुसार दिनांक ०५ मे, २०२५ ते दिनांक ०६ मे, २०२५ या कालावधीत धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

तापीच्या खोऱ्यात खारपाणपट्ट्यासाठी दोन कालवे बांधण्याच्या प्रकल्पाबाबत

(४१) १२२३६ (१९-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भ व जळगाव सारख्या खारपाणपट्ट्यातील पेयजल व सिंचनाची समस्या दूर करण्यासाठी तापीच्या खो-यात खारिया गुटीघाट धरणापासून २२१ व २६० किलोमीटर लांबीचे दोन कालवे बांधण्यात येणार असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकल्पाच्या बांधकामासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सदरील कालवे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२१-११-२०२५) : (१) अंशतः खरे आहे.

प्रस्तावित तापी खोरे महाकाय पुनर्भरण योजने अंतर्गत उजवा कालवा २२१ किमी, डावा कालवा-(I) १३६ किमी व डावा कालवा-(II) १२४ कि.मी. लांबीचे कालवे प्रस्तावित आहेत.

उजवा कालवा द्वारे महाराष्ट्रातील रावेर, यावल व चोपडा या तालुक्यातील १,३०,६३५ हे. क्षेत्राला व डावा कालवा-I द्वारे धारणी तालुक्याला ३०७१ हे. क्षेत्रास तसेच डावा कालवा-(II) द्वारे विदर्भाच्या खारपण पट्ट्यातील जळगाव जामोद, संग्रामपुर, तेल्हारा, अकोट, अचलपुर व अंजनगाव सुरजी, या तालुक्यातील ८०००० हे. असे एकुण २,१३,७०६ हे. क्षेत्रास पुर्नभरणाद्वारे लाभ प्रस्तावित आहे.
(२) तापी खोरे महाकाय पुनर्भरण योजनेचा प्रकल्प अहवाल मुख्य अभियंता, प्रकल्प मूल्यांकन समिती, केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली ची वेबसाईट e-PAMS या पोर्टलवर दिनांक २९ जून, २०२४ नुसार ऑनलाइन सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र व मध्यप्रदेश या राज्यामध्ये सामंजस्य करार (MOU) दिनांक १० मे, २०२५ रोजी करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन निर्माण करण्यासंदर्भात

(४२) १२३९३ (०८-०९-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठामध्ये "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन" स्थापन करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अध्यासन स्थापनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-१०-२०२५) : (१) होय.
(२) महाराष्ट्रातील विविध अकृषि विद्यापीठांमध्ये थोर व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्र निर्माण करण्यासंदर्भात तयार करण्यात आलेल्या धोरणास मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक ०७.०६.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार नविन अध्यासन केंद्र सुरु करावयाची असल्यास विद्यापीठ निधीतून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
सदर मान्यतेच्या अनुषंगाने नविन अध्यासन केंद्र सुरु करावयाची असल्यास विद्यापीठ निधीतून सुरु करण्याबाबत दिनांक १८.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच मा.लोकप्रतिनिधींनी अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्याच्या सुचना दिनांक १६.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शिवाजी विद्यापीठाला देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शिक्षक भरती व शिक्षणसेवक पद्धतीबाबत

(४३) १२४४० (०८-०९-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होऊन पाच वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला असून, त्यानुसार गुणवत्ताधिष्ठित शिक्षक नेमणूक प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणात शिक्षक भरतीसाठी कंत्राटी शिक्षक, पॅरा टीचर अशा स्वरूपातील नेमणुकांवर बंदी घालून, पात्र उमेदवारांची गुणवत्ताधिष्ठित परीक्षा व थेट शिक्षक पदावर नियुक्ती करण्याबाबत स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात या धोरणाच्या अंमलबजावणीनुसार आतापर्यंत शिक्षक अभियोग्यता परीक्षा दोन वेळा घेण्यात आल्या असून, 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातून निवड करण्यात आलेल्या डी.एड. व बी.एड. पात्र उमेदवारांना शिक्षणसेवक म्हणून तीन वर्षांकरिता नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणसेवक पद्धती बंद करून थेट पूर्णपगारी शिक्षक भरतीची तरतूद लागू करण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१) व (२) कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता २० व २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर मंजूर दोन शिक्षकांपैकी एक सेवानिवृत्त शिक्षक/डीएड बीएड अर्हताधारक बेरोजगार शिक्षकाची मानधनावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करणेबाबतचा निर्णय दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे. तसेच सद्यस्थितीत शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव शासन पत्र दिनांक ०७ जुलै, २०२३ नुसार करण्यात येत असलेली कंत्राटी शिक्षकांची नियुक्तीबाबतची तरतूद करण्यात आली आहे. सदरचे कंत्राटी तत्वावरील नियुक्त शिक्षक हे पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षक नियुक्त होईपर्यंतच कार्यरत राहणार आहेत.

(३) व (४) शिक्षण सेवक योजनेंतर्गत निवड झालेल्या शिक्षकास ठोक मानधनावर ३ वर्षांकरीता नियुक्ती देण्यात येते. या कालावधीत त्याने पार पाडलेल्या कामगीरीचे यथोचित मुल्यमापन करुन त्यास सेवेत नियमित करण्यात येते. एका प्रकारे हा शिक्षक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी आहे. शिक्षण सेवक योजनेमुळे उमेदवारांच्या शिक्षक पदावरील नियमित नियुक्तीस बाधा पोहोचत नाही. शिवाय शिक्षण सेवक पदावरील सेवा वरीष्ठ वेतनश्रेणीकरीता व सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात येत असल्याने एकूण अर्हताकारी सेवेच्या कालावधीवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. तसेच शासन निर्णय दिनांक ०७.०२.२०२३ अन्वये या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. या सर्व बाबी तसेच संभाव्य वित्तीय भार विचारात घेता, शिक्षण सेवक योजना रद्द करता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील सती नदी प्रकल्पास प्रशासकीय मान्यतेबाबत

(४४) १२४५४ (३०-०७-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील सती नदी प्रकल्पाला शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे काय, त्या मान्यतेचा क्रमांक व दिनांक काय आहे,

(२) असल्यास, खोब्रागडी नदी प्रकल्पास शासनाकडून मान्यता मिळालेल्या अहवालात सती नदी प्रकल्पाचा समावेश

करण्यात आलेला आहे काय, सदर सती प्रकल्पामध्ये येणाऱ्या बुडीत क्षेत्राचा तपशील, विशेषतः वनजमिनीचे क्षेत्रफळ, तसेच तालुका कोरची व कुरखेडा या भागांतील बाधित क्षेत्रफळ किती आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने आयोजित अधीक्षक अभियंता यांची बैठक झाली होती काय, त्यामध्ये प्रकल्प लाभाचे क्षेत्र व लाभवाय गुणवत्ता (irrigation efficiency) काढण्याबाबत कोणते निर्देश देण्यात आले आहेत,

(४) असल्यास, प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या दरसूचीमध्ये वर्ष २०११-१२ नुसार अद्यावत किंमतीचा विचार करण्यात आलेला आहे काय,

(५) असल्यास, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कोणत्या विभागाने अहवाल तयार केला आहे व सद्य:स्थितीत काम सुरु आहे काय, तसेच या प्रकल्पामुळे किती गांवे बाधित होणार आहेत, त्यांच्या पुनर्वसनाचा तपशिल काय आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२१-११-२०२५) : (१) होय,

जलसंपदा विभागाच्या (पुर्वीचे पाटबंधारे विभाग) दिनांक २८ मार्च, १९८३ शासन निर्णयान्वये सती नदी प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती. मात्र सदर प्रकल्प वनबाधित असल्यामुळे वनजमिनीच्या प्रस्तावाला मान्यता न मिळाल्यामुळे प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली आहे.

(२) नाही.

१) खोब्रागडी नदी प्रकल्प ता. कोरची, जि. गडचिरोली या प्रकल्पाला दिनांक ०६ जानेवारी, १९९६ **अन्वये** प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

२) सती नदी प्रकल्प व खोब्रागडी नदी प्रकल्प या प्रकल्पांचे लाभक्षेत्र व बुडीत क्षेत्र हे स्वतंत्र आहे. व या प्रकल्पांना शासनाकडुन स्वतंत्र प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

सती नदी प्रकल्प (ता. कुरखेडा)

एकुण बुडीत क्षेत्र - ३५५० हे.

वनजमीन क्षेत्र - ३५१ हे.

(३) होय.

अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपुर यांच्या दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत सती नदी प्रकल्पाची वेगवेगळ्या तलांकानुसार लाभव्यय गुणोत्तर काढण्यात यावे. या बाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर आकडेमोड करुन अभ्यास करण्यात आला आहे.

(४) या प्रकल्पाचे सुधारित नियोजनासंदर्भात विविध पर्यायांचा अभ्यास अद्यावत दरसूचीनुसार क्षेत्रियस्तरावर करण्यात येत आहे.

(५) या प्रकल्पा संदर्भात वनजमीन तसेच बाधित गावे कमी करण्याचे दृष्टी ने विविध पर्यायांचा अभ्यास कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, चंद्रपूर या कार्यालया कडे सुरु आहे त्यामुळे सध्य:स्थितीत प्रकल्पाची अंमलबजावणी व पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) क्षेत्रिय स्तरावर अभ्यास करण्यात आले असता प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गावे व वनजमिन येत आहे. तथापि, तलांकानुसार बुडीत क्षेत्र कमी करण्याच्या दृष्टिने वेगवेगळे पर्याय लक्षात घेऊन क्षेत्रिय स्तरावर पर्यायी अभ्यास करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बळेगांव उच्च पातळी बंधारा (ता.उमरी, जि.नांदेड) या कामाच्या निविदेबाबत

(४५) १२९३१ (१९-०८-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा**

खोरे विकास महामंडळ) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळेगांव उच्च पातळी बंधारा (ता.उमरी, जि.नांदेड) या कामाच्या निविदेचा मुल्यांकन अहवालात पात्र ठरविलेल्या निविदाधारकांपैकी अभिराज इंजीकॉन प्रा.लि., पुणे या निविदाधारक कंपनीने रबल रॉकटो व पिचिंगचे परिमाणासाठी जे ‘CC’ जोडलेली आहे, त्यात जे परिमाण दर्शविलेली आहे ते वर्ष निहाय नसून दिनांक ४ फेब्रुवारी, २००० ते आतापर्यंत दिसत असून पॅरा ४.३.३. नुसार गत ५ वर्षामध्ये कोणत्या वर्षात किती आहे, हे निश्चित करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॅरा ४.३.२. नुसार कामाच्या अनुभवासाठी “Construction of Barrage Civil Work with Construction of Energy Dissipation Arrangement Work” चे कागदपत्र न जोडता K.T. Weirs च्या दुरुस्तीचे कागदपत्र जोडलेले असून त्यात EDA चा कुठेही उल्लेख नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामात एक निविदाधारक जो संबंधित निविदेचा पॅरा ४.३.२ व पॅरा ४.३.३ नुसार कुठेही पात्र होत नसतांना, मुख्य अभियंता (जलसंपदा), जलसंपदा, विभाग, छत्रपती संभाजीनगर, यांनी स्वतःच्या अधिकाराखाली कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दबाब टाकून, अपात्र होत असलेल्या निविदाधारकांशी संगनमत करून, त्यांना पात्र करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अधिकारांचा गैरवापर करून सदरची निविदा आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी वापरुन शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधा कृष्ण विखे-पाटील (२९-१०-२०२५) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कंत्राटदाराने जोडलेल्या CC मध्ये पिंचींगचे दर्शविलेले परिमाण गत पाच वर्षामधील कोणत्या वर्षात केले हे निश्चित करता येत नसले तरी कार्यकारी अभियंता यांनी इतर कामाकरीता दिलेल्या work done certificate मध्ये पिचींगचे वर्षनिहाय परिमाण दिलेले आहे.

तसेच कंत्राटदाराने दिलेल्या प्रपत्र २ ए मध्ये दर्शविल्यानुसार तीरु नदीवरील को.प.बंधाऱ्याचे Barrage मध्ये रुपांतरीत करण्याची कामे केल्याचा अनुभव जोडलेला आहे.

पात्र / अपात्र निविदाकारांची नावे संकेत स्थळावर प्रसिध्दीनंतर विहित मुदतीत कोणत्याही निविदाकाराने आक्षेप घेतलेला नाही. तसेच कोणतेही निविदाकार न्यायालयात गेलेले नाहीत.

सदर निविदेसाठी केवळ तीन कंत्राटदारांनी सहभाग नोंदविला होता निकोप स्पर्धा होऊन ११.११ % कमी दराने निविदा स्विकृत होवुन शासनाचा रु.३५०.८५ लक्ष इतका आर्थिक फायदा झाला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर निविदा प्रक्रियेत निकोप स्पर्धा झाल्याने व कमीत कमी आर्थिक देकाराची (-११.११%) निविदा स्विकृत केली असल्याने शासनाची रु.३५०.८५ लक्षाची बचत झाली आहे. त्यामुळे याबाबत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मोर्शी (जि.अमरावती) येथील शाळांना प्रवेश फी दिली गेली नसल्याबाबत

(४६) १३१२२ (०८-०९-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात गेल्या ५ ते ६ वर्षांपासून अनेक शाळांना शासनाकडून प्रवेश फी दिली गेली

नसल्याने शाळांचे व्यवस्थापन अडचणीत आले असून मेष्टा संघटना महाराष्ट्र, इंग्लिश ट्रस्ट असोसिएशन व मोर्शी येथील इंग्रजी शाळांचे सर्व मुख्याध्यापक यांनी पंचायत समिती, मोर्शी येथील गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदन दिले असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनानाकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असलयास, निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित शाळांना प्रवेश फी चा प्रलंबित निधी वितरित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३१-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आरटीई २५ टक्के अंतर्गत राखीव जागावर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी सन २०२४-२५ पर्यंत रू.३६९९.०९ कोटी इतकी थकीत रक्कमेची मागणी आहे. आतापर्यंत, राज्य शासनाने रू. १६१७.५३ कोटी निधी वितरित केलेला असून रू.२०७८.४१ कोटी इतकी प्रलंबित शुल्काची रक्कम आहे. राज्यातील सर्वच पात्र शाळांना शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्याच्या अनुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित तरतूद रू. १७३ कोटी तसेच, पुरवणी मागणी व रू.पुनर्विनियोजनाव्दारे रू. २६२.५६ कोटी इतका निधी उपलब्ध करून एकूण रू. ४६२.५६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. आरटीईच्या प्रलंबित शुल्काकरिता सन २०२५-२६ आर्थिक वर्षात रू. २०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून आगामी हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे निधी उपलब्ध करून घेण्यासाठी वित्त विभागाच्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेदरम्यान केंद्रावर सर्व्हर डाऊन होऊन परीक्षार्थींना मनस्ताप झाल्याबाबत

(४७) १३१८४ (०८-०९-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील येथील राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने तीन वर्षांनंतर घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TET) परीक्षेदरम्यान, एका परीक्षा केंद्रावर सर्व्हर डाऊन होऊन परीक्षार्थींना मनस्ताप सहन करावा लागल्याची घटना माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व्हर डाऊनच्या कारणामुळे संबंधित परीक्षार्थींना ऑनलाइन प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तांत्रिक अडथळयामुळे परीक्षार्थींना झालेल्या शैक्षणिक नुकसानीबाबत वा अन्य पुनर्परीक्षेच्या बाबतीत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडून लेखापरीक्षण अहवाल न सादर होण्याबाबत

(४८) १३१९२ (०८-०९-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने वर्ष २००८ पासून शासनाकडे एकही लेखापरीक्षण अहवाल सादर केलेला नसून हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी दिनांक २२ मार्च, २०२५ रोजी बोर्ड बरखास्त करण्याची मागणी मुख्यमंत्री व अल्पसंख्याक विकासमंत्र्यांना निवेदनाद्वारे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखापरीक्षण अहवाल सादर करणे वक्फ कायदा, १९९५ नुसार बंधनकारक असतानाही महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने अहवाल सादर केला नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वक्फ बोर्डाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी तसेच वार्षिक लेखापरीक्षण अहवाल नियमितपणे सादर होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड शासनाच्या आदेशांचे पालन करत नसेल, तर वक्फ कायद्यातील संबंधित कलमानुसार बोर्ड बरखास्त करण्याची तरतूद आहे काय?

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१) होय, खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. शासनाकडून वेळोवळी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास स्थानिक लेखा परिक्षकांकडून लेखापरिक्षण करुन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरुन वक्फ मंडळाने सन २००२-०३ ते सन २०१७-१८ या कालावधीतील लेखापरिक्षण अहवाल वक्फ मंडळाने सादर केलेले आहेत तसेच पुढील अहवाल सादर करण्याबाबत वक्फ मंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) राज्य शासनाने उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अंतर्गत दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी न केल्यास सदर कायद्यातील कलम ९९ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळ बरखास्त करण्याची तरतूद अधिनियमात करण्यात आलेली आहे.

(५) उम्मीद अधिनियम १९९५ मधील कलम ८० अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल सादर करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी वक्फ मंडळास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

गोंदिया येथील साकेत पब्लिक स्कूल याची मान्यता रद्द करण्याबाबत

(४९) १३३२९ (०८-०९-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथील अवधूत शिक्षण संस्था, गोंदिया द्वारा संचालित साकेत पब्लिक स्कूल, गोंदिया या शाळेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०११ मधील कलम ३ व अनुसूची ‘क’ मधील अ.क्र. ११ अंतर्गत असलेल्या जमीन मालकी किंवा भाडेपट्टा विलेखाच्या तरतुदींचा भंग केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी पाठविले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३०-१०-२०२५) : (१) व (२) होय.

अवधूत शिक्षण संस्था, गोंदिया संचलित साकेत पब्लिक स्कूल, गोंदिया या शाळेची मान्यता काढून घेण्याचा

प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून दिनांक १०.१०.२०२४ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

(३) सदरहू शाळेची मान्यता काढण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मधील तरतुदीनुसार शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, उक्त अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी सदरहू शाळेस १९९९ मध्ये मान्यता दिलेली असल्याने, शासन परिपत्रक दिनांक १८ एप्रिल, २०१३ मधील तरतूदीनुसार तपासणी करून व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, ही बाब विचारात घेऊन त्यांचे समायोजनाचा आराखडा तयार करुन, प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांना दिनांक ०८ जुलै, २०२५ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील खासगी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारण्याबाबत

(५०) १३५५६ (०८-०९-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाचा हक्क अधिनियम (RTE) २००९ अंतर्गत मुंबईतील खासगी शाळांमध्ये २५% जागा राखीव ठेवणे बंधनकारक असतानाही, अनेक शाळांमध्ये या जागांवर प्रवेश न देण्याच्या कारणाने त्या रिक्त राहत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र पालकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करूनही शाळांकडून त्यामध्ये त्रुटी असल्याचे दाखवून प्रवेश नाकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-१०-२०२५) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) आरटीई प्रवेशासाठी एनआयसी या संस्थेद्वारे तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या प्रणालीद्वारे लॉटरी काढून पालकांना वेळोवेळी मार्गदर्शक सुचना देण्यात येऊन प्रवेश प्रक्रियेअंती पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना ऑनलाईन नमूद करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीसाठी लॉगिनवर दर्शविण्यात आलेल्या पडताळणी समितीकडे उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येतात.

तथापि, प्रवेशाकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी कागदपत्र पडताळणी समितीकडे संपर्क साधला नाही किंवा प्रवेशासंबंधीची कागदपत्रे सादर केली नाहीत, विहीत मुदतीत संपर्क साधला नाही, अशा विद्यार्थ्यांना Not Approach मध्ये दर्शविण्यात येते.

खाजगी शाळांकडून आरटीई कायद्याचे उल्लंघन केले जात असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

वि.स. २० (37)

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.